दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३३० वा | सोमवार दि. २५ सप्टेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६


## देवेंद्र फडणवीसांनी केली पूरग्रस्त भागाची पाहणी!

**नागपूर ।** शुक्रवारी रात्री आणि शनिवारी सकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे नागपुरात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती.



अर्धे शहर पाण्यात बुडालेले दिसून आले. लोकांच्या घरात आणि दुकानांमध्ये पाणी शिरलेले दिसत होते. आंबाझरी तलाव आणि नाग नदीच्या आसपासच्या भागात सर्वाधिक नुकसान झाले. रविवारी भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पूरबाधित भागातील नुकसानीचा आढावा घेण्यासाठी पोहोचले. यावेळी त्यांनी लोकांशी संवादही साधला. मात्र, त्यांना पीडितांच्या रोषाला सामोरे जावे लागले.

## न्यूज कॉलम

### आमदार अपात्र प्रकरणावर आज दुसरी सुनावणी

**मुंबई ।** शिवसेना आमदार अपात्र प्रकरणाची मोठी अपडेट समोर आली आहे. शिवसेनेच्या अपात्र आमदार प्रकरणाची दुसरी सुनावणी आज विधानसभेत पार पडणार आहे. विधानसभेत आमदार अपात्र प्रकरणाची पहिली सुनावणी १४ सप्टेंबर रोजी झाली. त्यानंतर आता या प्रकरणाची दुसरी सुनावणी सोमवारी घेतली जाणार आहे. या सुनावणीदरम्यान विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर काय निर्णय घेणार, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### शिक्षकाला लुटले; एकाला अटक

**धुळे ।** शहरानजीक वडेल चौफुलीच्या पुढे भरदिवसा कळंबू (ता. शहादा, जि. नंदुरबार) येथील शिक्षकाला मारहाण करत लुटण्यात आले. याप्रकरणी चार अनोळखी तरुणांवर गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी एका संशयिताला अटक केली. परेश बोरसे हे शिक्षक शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास वडेल चौफुलीवरून जात होते. यादरम्यान त्यांना चार अनोळखी तरुणांनी रस्त्यात अडवून त्यांच्या कानशिलात मारली. तसेच अंगावर दगड उगारून मारून टाकण्याची धमकी दिली. खिशातील दोन हजार रुपये काढून नेले.

# अर्थखाते टिकेल की नाही, सांगता येत नाही : अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

आज माझ्याकडे अर्थखाते आहे. त्यामुळे आपल्याला झुकते माप मिळते. पण, यापुढे अर्थखाते टिकेल की नाही टिकेल, सांगता येत नाही,असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटल्याने राजकीय वर्तुळात चर्चांनी जोर धरला आहे. यातच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सोबत झालेल्या बंददाराआड चर्चेसाठी अजित पवार उपस्थित नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

दरम्यान अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, मला या विषयावर काही बोलायचे नाही. मला विकासाबद्दल विचारा. मी विकासासाठी बैठका घेतोय. माझे ध्येय फक्त विकास एके विकास एवढाच आहे. शरद पवार आणि प्रफुल्ल पटेल यांचा संसदेतील फोटो व्हायरल झाला आहे. त्यांचा या फोटो बद्दल शरद पवार यांनी प्रफुल्ल पटेल यांच्याकडे नाराजी व्यक्त केली. या विषयावर त्यांना प्रश्न करण्यात आला होता. बारामतीमध्ये एका कार्यक्रमात सहकार संस्था आणि कारखान्यांसंदर्भात बोलताना अजित पवार यांनी हे वक्तव्य केले आहे. वाचाळवीरांची संख्या सध्या वाढली आहे, त्यांच्यावर बोलण्यापेक्षा मला विकासकामांवर लक्ष देणे महत्त्वाचे वाटते, कोण काय म्हणाले त्यांच्या वक्तव्यावर आपण वक्तव्य करणे ही महाराष्ट्राची संस्कृती नाही, आणि परंपरा नाही, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या टीकेवर केले आहे. २३ तारखेला मी बारामतीला वेळ दिलेली होती. त्यामुळे अमित शाह यांच्या दौऱ्यामध्ये सहभागी होऊ शकलो नव्हतो. बारामती येथील पाच महत्त्वाच्या संस्था सहयोग गृहनिर्माण संस्था, बारामती बँक, बारामती खरेदी-विक्री संघ, बारामती दूध संघ आणि बाजार समिती; यांच्या जनरल बॉडीची मीटिंग होती. या बैठकांचा अजेंडा पंधरा दिवस आधीच ठरलेला होता. त्यामुळे मला अमित शहांच्या दौऱ्यामध्ये जाता आले नाही.



### न्याय मागण्याचा अधिकार

**शरद पवार गटाने विधानसभा अध्यक्षांकडे तक्रार केली आहे. त्यांनी अजित पवार गटातील आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी केली आहे. त्यावर बोलताना अजित पवार म्हणाले की, प्रत्येकाला तक्रार करण्याचा आणि न्याय मागण्याचा अधिकार आहे. कायद्याच्या नियमांच्या चौकटीत बसवून त्यावर निर्णय देतील.**

### वाचाळवीरांची संख्याच वाढली

**गोपीचंद पडळकरांनी केलेल्या टीकेबाबत विचारले असता अजित पवार म्हणाले, हा असे म्हटला, तो तसा म्हटला यावर मला बोलायचे नाही. सध्या वाचाळवीरांची संख्याच वाढली आहे. त्यांच्या वक्तव्यावर आपण काहीतरी वक्तव्य करणे ही आपल्या महाराष्ट्राची संस्कृती नाही आणि परंपराही नाही. आपण आपले काम करत रहायचे. अजित पवार पुढे म्हणाले की,अमित शहा यांच्या दौऱ्यामध्ये सहभागी होऊ शकत नाही, याबाबत मी अमित शहा यांच्या कार्यालयाला कळवले होते. शिवाय राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याही कानावर घातले होते, असे पवारांनी स्पष्ट केले आहे.**

### ते नैसर्गिक विधान : चंद्रशेखर बावनकुळे

**दरम्यान, अजित पवार यांच्या या विधानावर भाजपने सारवासारव सुरू केली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. भविष्यात काय होईल कुणालाही माहिती नाही. अजित पवाराचं हे वक्तव्य नैसर्गिक आहे. ते राजकीय विधान नाही. उद्या काय होईल हे तुम्ही तरी सांगू शकता का? तेच अजितदादांनी सांगितलं.**

#### मविआ सरकारमधील किस्सा

उद्धव ठाकरेंबरोबर उपमुख्यमंत्री असताना अनेक योजनांच्या फाइल्स आमच्यापुढे यायच्या. त्यात कोणत्या गावांची नावे आहेत, हे बघायचे, बारामतीचे नाव नसेल, तर टाकायचे आणि सही करायची. अशा पद्धतीने आपल्याला ४२ कोटी रूपयांचं मॅग्नेटचे काम मिळाले, असा किस्साही अजित पवार यांनी सांगितला.

#### तर दोन पळ्या जास्त मिळतात

७५ टक्के बारामती झोपलेली असते. तेव्हा मी कामाला सुरुवात करतो. माझ्या दौऱ्यामुळे लोकांना त्रास होवू नये हा उद्देश असतो. तुम्हा सगळ्यांच्या प्रेमामुळे उपमुख्यमंत्री, अर्थ खाते माझ्याकडे आले. सर्व खात्यांना निधी देण्याचा अधिकार माझ्याकडे आहे. २८८ मतदारसंघात निधी देतोच. पण वाढप्या ओळखीचा असेल तर बारामतीकर दिसल्यावर दोन पळ्या जास्त पडतात.

# महात्मा फुले यांनी मांडलेल्या सत्यशोधक विचारांची आजही समाजाला आवश्यकता




### मंत्री छगन भुजबळ यांचे प्रतिपादन

### प्रा.हरी नरके यांच्या निधनाने सत्यशोधक समाजाच मोठ नुकसान

**नाशिक । प्रतिनिधी**

महात्मा फुले हे विज्ञानाचे, आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते होते. त्याचं हे काम पुढे नेण्याचे काम हे अतिशय चिकाटीच आहे, गरजेचे आहे. कारण महात्मा महात्मा फुले यांचा विचार हा परिवर्तनाचा, विज्ञानाचा पुरस्कार करणारा, समाजातील शेवटच्या माणसचे हित जोपासणारा व त्यांच्या दु:खांची मांडणी करणारा विचार आहे तो वाढविला पाहिजे, अधिक वृद्धिंगत करायला हवा. महात्मा फुले यांचे हे विचार आजच्या काळातही समाजाच्या उभारणीसाठी अत्यंत उपयुक्त असून त्यांचे हे विचार देशातील शेवटच्या तरुणाच्या मनात रुजविण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

सत्यशोधक समाज स्थापनेच्या शतकोत्तर सुवर्ण वर्षपूर्ती व सत्यशोधक चळवळीचे संशोधक प्रा.हरी नरके यांच्या स्मृती प्रित्यर्थ सत्यशोधक समाजाचे ४१ वे महाराष्ट्र राज्य अधिवेशन जेजुरकर लॉन्स येथे नाशिक येथे पार पडले. या अधिवेशनाच्या समारोप कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी स्वागताध्यक्ष विश्वासराव मोरे, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे उपाध्यक्ष दिलीप खैरे, विजय राऊत, समाधान जेजुरकर, अरविंद खैरनार, अशोक मंडलिक, शिवा बागुल, निवृत्ती बोराटे, अशोक सोनवणे, आप्पा जगताप यांच्यासह सत्यशोधक समाजातील पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, चक्रधर स्वामी यांनी लिळाचरित्र ग्रंथ लिहिला यातून सर्व धर्म एकच आहे. स्त्री पुरुष कुठलाही भेद नाही. अंधश्रद्धा दूर करण्यासाठी ११ व्या शतकात त्यांनी विचार मांडले. त्यावेळी त्यांनाही विविध अडचणींचा सामना करावा लागला. त्याच विचारांवर काम करत असताना महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह समाजसुधारकांना देखील त्रास झाला. संत ज्ञानेश्वरांपासून आजपर्यंत अनेकांना झाला. याच विचारांवर प्रा.हरी नरके यांचे साहित्य अतिशय महत्वाच असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी सत्यशोधक या चित्रपटाचा टिझर प्रदर्शित करण्यात आले. हा सत्यशोधक सिनेमा सर्वांनी पहावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# भाजपा प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे आज नाशिक दौऱ्यावर

### भाजप महानगराध्यक्ष प्रशांत जाधव यांची माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे हे लोकसभा महाविजय अभियान अंतर्गत आज दि. २५ सप्टेंबर रोजी नाशिक दौऱ्यावर येत आहेत. अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी दिली. आ.चंद्रशेखर बावनकुळे हे लोकसभा विजय अभियानांतर्गत संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. त्याअंतर्गत या दौऱ्याला विशेष महत्त्व असल्याचे शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी सांगितले.



आ.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नियोजित दौऱ्याची रूपरेषा पुढील प्रमाणे आहे. आज दि. २५ सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठ वाजता सय्यद पिंपरीकडे रवाना. देवळाली मतदारसंघांतर्गत सय्यद पिंपरी येथे तनुजा घोलप यांचे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन, त्यानंतर वसंत ढिकले यांची सदिच्छा भेट घेतील.

सय्यद पिंपरी येथून साडेनऊ वाजता त्र्यंबकेश्वरकडे रवाना होतील. तर साडेदहा वाजता त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन, सकाळी सव्वा अकरा वाजता त्र्यंबकेश्वर येथे तीन विधानसभा अंतर्गत तीनशे प्रमुख बूथ वारीअर्स यांची एकत्रितपणे बैठक, दुपारी साडेबारा वाजता घर चलो अभियानात सहभाग व सहभाग कार्यक्रमात नागरिकांशी सुसंवाद. दुपारी दोन वाजता नाशिककडे येतील. दुपारी अडीच वाजता माऊली लॉन्स डीजीपीनगर नाशिक येथे कामगार मेळाव्यात कामगारांना संबोधित करणार आहेत. दुपारी तीन वाजून पंचवीस मिनिटांनी प्रसाद मंगल कार्यालय गंगापूर रोड येथे तीन विधानसभेतील प्रत्येकी १०० याप्रमाणे ३०० बूथ वॉरियर्स च्या बैठकीला संबोधित करणार व लोकसभा महाविजय अभियानाच्या संकल्पना सादर करणार आहेत.

सायंकाळी पाच वाजता सातपूर येथे आगमन व त्यानंतर घर घर चलो अभियानात सातपूर कॉलनी पोस्ट ऑफिस ते आनंदच्या सर्कलपर्यंत घर घर चलो अभियानांतर्गत नागरिकांशी सुसंवाद साधणार आहेत. सायंकाळी सहा वाजता पंचवटीकडे रवाना, सायंकाळी साडेसहा ते साडेसात दरम्यान नाशिक पूर्व विधानसभेतील परिसरातील प्रमुख व प्रभावी व्यक्तींची भेट, परिवारातील व्यक्तींची भेट व सुसंवाद, संध्याकाळी सव्वा सात वाजता सोयीनुसार धुळ्याकडे रवाना अशी माहिती प्रशांत जाधव यांनी दिली. त्र्यंबकेश्वर येथे नियोजित कार्यक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. त्रिंबकेश्वर येथील नियोजित कार्यक्रमाची सविस्तर माहिती देण्यात आली. प्रदेश अध्यक्षांच्या प्रवासाचे नियोजन व तयारी प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, राज्य लोकसभा प्रवास संयोजक बाळा भेगडे, आ. सीमा हिरे, आ. देवयानी फरांदे, नाशिक लोकसभा समन्वयक गिरीश पालवे, लोकसभा निवडणूक प्रमुख केदा आहेर, नाशिक शहर भाजपा जिल्हाध्यक्ष प्रशांत जाधव तथा नाशिक दक्षिण भाजपा जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव यांच्यासह सर्व विधानसभा निवडणूक प्रमुख व जिल्हा कार्यकारिणीतील सर्व प्रमुख कार्यकर्ते करीत आहेत.

# जिल्हाभरातील ३५ सार्वजनिक मंडळांकडून लाडक्या बाप्पाला निरोप!

**धुळे । प्रतिनिधी**

शहरासह जिल्हाभरात गणेश चतुर्थीच्या दिवशी घरगुती व सार्वजनिक गणेश मंडळातर्फे गणपतीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानंतर गणपती विसर्जन टप्प्याटप्प्याने होत आहे. त्यात दीड दिवस व तिसऱ्या दिवशी विसर्जनानंतर पाचव्या दिवशी व सहाव्या दिवशी विसर्जन झाले.

विसर्जनासाठी चांगली व्यवस्था महापालिका व संबंधित ठिकाणांच्या पालिका प्रशासनातर्फे करण्यात आली आहे. पाचव्या दिवशी ३५ मंडळांसह शेकडो घरगुती गणपतीचे विसर्जन करण्यात आले. अतिशय उत्साहात सुरक्षितरित्या हे विसर्जन पार पडले. महापालिका, नगरपालिका व पोलिस दलाच्या वतीने विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर सर्वतोपरी काळजी घेण्यात आली. विसर्जन घाटांवर कृत्रिम तलावांसह कोणीतीही अनुचित घटना घडू नये कर्मचाऱ्यांची म्हणून नियुक्ती करण्यात आली. दरम्यान मोठ्या मूर्तींचे तापी नदीत



विसर्जन करण्यात आले. यासाठी प्रकाश संयोजनाची तसेच सीसीटिव्हींची व्यवस्थाही करण्यात आली होती. सर्वधर्मियांनी जातीय सलोख्याचे दर्शन यानिमित्ताने दाखवले. धुळे शहरात पाचव्या दिवशी गणपती विसर्जनासाठी पांझरा नदी किनारी आठ ठिकाणी विसर्जनाची सुविधा करण्यात आली होती. त्यात मुख्यतः हत्ती डोह, त्यानंतर शिवाजी रोडवर स्वामी समर्थ केंद्र, दाता सरकार दर्गा समोर, अग्रवाल भुवनसमोर, कालिंका माता मंदिर, गणपती मंदिर, कुमारनगर, एसआरपी कॉलनी येथील घाटावर महापालिकेचे पथक नियुक्त करण्यात आले होते. प्रत्येक ठिकाणी विसर्जनासाठी पाण्याचे कृत्रिम हौद ठेवण्यात आले होते. त्याचप्रमाणे मूर्ती संकलनाचीही व्यवस्था करण्यात आली होती. तर निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र फिरत्या वाहनाची व्यवस्था होती. सर्वच विसर्जन स्थळावर पथदिव्यांची व्यवस्था होती. महापालिकेच्या वतीने कृत्रिम हौदांसह निर्माल्य संकलनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. पूजेचे साहित्य दिसताच त्याचे संकलन करण्यात येत होते. निर्माल्य इतरत्र फेकले जाणार नाही याची काळजी स्वतःच अनेक गणेशभक्त घेत असल्याचे दिसून आले. हत्ती डोहात खोल पाण्यात जाण्यापासून कर्मचारी मज्जाव करताना दिसून आले. यासह बालकांची काळजी घेण्याचे आवाहनही ते करीत होते. कृत्रिम हौदांमध्येही अनेक गणेशभक्तांनी आपल्या बाप्पांचे विसर्जन करत महापालिकेला सहकार्य केले. सार्वजनिक स्वच्छतेची व नियमांचे उल्लघन होणार नाही याची काळजी सर्वच घेताना दिसले. पोलीस दलाच्या वतीनेही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रात्री उशिरापर्यंत विसर्जन मिरवणुका सुरु होत्या.




## ऋण काढून सण नको!

जगात दरडोई कमी उत्पन्न असतानाही बचतीची सवय अंगी मुरलेले जे देश आहेत; त्यात भारत अग्रभागी आहे. सर्वसामान्य भारतीय माणूस उधळ्या वृत्तीचा किंवा हातात आलेला सगळा पैसा खर्चून टाकणारा नाही. तो चार पैसे मिळाले, तर त्यातला एक पैसा मागे राखायचा प्रयत्न करतो. त्याची ही सवयच मॅक्रो अर्थकारणाला स्थैर्य देत असते. गेल्या वर्षीचे जे आकडे प्रकाशित झाले होते, त्यानुसार सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या म्हणजे जीडीपीच्या २९.८४ टक्के इतकी बचत भारत करीत होता. त्याचा हा क्रमांक जगात एकोणिसावा होता. मात्र, अनेक विकसित तसेच युरोपीय देश या निकषावर भारताच्या बरेच मागे होते. आता भारताची गेल्या आर्थिक वर्षातील निव्वळ घरगुती बचत ५५ टक्क्यांनी घसरून ५.१ टक्केच झाल्याची आकडेवारी प्रकाशित झाली आहे. हा गेल्या पन्नास वर्षांतील नीचांक असल्याचेही म्हटले जाते. प्रचंड बचत करणारा भारतीय माणूस आणि भारतीय कुटुंबे अशी का वागत आहेत, हा अर्थशास्त्रज्ञांपुढचा एक प्रश्न ठरू शकतो. त्याची उत्तरे शोधावी लागतील. ही कमी झालेली बचत समजावून घेण्यासाठी आणखी दोन आकडेवाऱ्या पाहणे योग्य ठरेल. एकतर, एरवी बचतीसाठी वापरला जाणारा फार मोठा हिस्सा मालमत्तांच्या खरेदीसाठी खर्ची पडल्याचे आकडेवारी दाखवत आहे. ही एका परीने चांगली खूण आहे. स्थावर किंवा जंगम मालमत्तांची खरेदी ही एका प्रकारे गुंतवणूकच असते. गुंतवणूक ही बचतीशिवाय होऊ शकत नाही आणि तिचे पुन्हा रूपांतर बचतीमध्ये करणे शक्य असते. तेव्हा हा मुद्दा फार काळजीचा मानायचे कारण नाही. दुसरा मुद्दा मात्र काहीसा काळजी करण्याचा आहे. मागच्या आर्थिक वर्षात भारतीय कुटुंबांवर एकत्रितपणे ८.२ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर असल्याचे 'एसबीआय रिसर्च'चा अहवाल सांगतो. कर्ज हीसुद्धा गुंतवणूक असते आणि कर्जातून उभ्या राहणाऱ्या उद्योगांमधून नवी धननिर्मिती होत असते. मात्र, ही कर्जे केवळ गृहोपयोगी किंवा चैनीच्या वस्तू घेण्यासाठी घेतली गेली तर ती फेडण्यासाठी निश्चित, खात्रीचे उत्पन्न असणे आवश्यक असते. तसे ते नसेल, तर या कर्जांचा बोजा कुटुंबांचे अर्थस्वास्थ्य बिघडवू शकतो. तसे नेमक्या किती कुटुंबांच्या बाबतीत झाले आहे, हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे. वरील कर्जबाजारीपणामध्ये एक कधीही सांगितली न जाणारी किंवा लपून राहणारी बाब आहे. काही काळापूर्वी एक आकडेवारी प्रकाशित झाली होती. तिच्यानुसार दर भारतीयाचे सरासरी दरमहा उत्पन्न एक हजार ६६१ रुपये होते. त्याच काळात प्रत्येक भारतीयाचा दारूवरचा दरमहा सरासरी खर्च एक हजार ९३८ रुपये होता. याच काळात देशातल्या सर्व राज्यांचे अबकारी कर उत्पन्न वाढलेच होते. मात्र, दारूवरच्या वाढत्या खर्चामुळे देशात गरीब कुटुंबांवरचा कर्जाचा भार वाढतो आहे. कर्जाचा वाढता भार, याचाच दुसरा अर्थ उणावत जाणारी बचत. दारूवर रोज अब्जावधी रुपये खर्च करणारी लाखो गरीब कुटुंबे बचत न करता कर्जाच्या विळख्यात सापडत आहेत. मात्र, या रोगाकडे एकही सरकार गंभीरपणे लक्ष देणार नाही, हे उघडच आहे. भारतीयांची बचत कमी होण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण सोप्या वाटणाऱ्या हप्त्यांवर होणारी प्रचंड खरेदी हेही असल्याचे उघड झाले आहे. पूर्वी आधी बचत करायची आणि नंतर जमेल तशी वस्तू विकत घ्यायची, अशी मध्यमवर्गीय तसेच मध्यममार्गी रीत होती. ती आता बरोबर उलटी झाली आहे. आधी खर्च करा आणि नंतर कमवा किंवा नंतर फेडा, या कर्ज आणि व्याजाधारित बाजार व्यवस्थेमुळे खिशातली निव्वळ बचत कमी होत चालली आहे. अशा प्रकारे होणारा खर्च सामान्य नागरिकांना कितपत महाग पडतो, याचा नेमका हिशेब अनेकदा मांडला जात नाही. या ताज्या पाहणीत घरे आणि गृहोपयोगी वस्तूंच्या कर्जाचा आकडा ७.१ लाख कोटी रुपयांच्या घरात गेल्याचे दिसते आहे. यातील घरांची खरेदी ही एक प्रकारे गुंतवणूक मानता येते. गृहबांधणी उद्योगातून अर्थकारणाला अनेक प्रकारे चालनाही मिळत असते. मात्र, इतर कर्जे घेताना आपण चंगळवादी सापळ्यात तर सापडत नाही ना, याचा विचार सर्वांनी करायला हवा. प्रत्येक उत्पादक आणि विक्रेता त्याचा माल विकायला बसलेलाच असतो. मात्र, आपला खिसा आणि आपली नेमकी गरज यांची सांगड प्रत्येकाला जागृत ग्राहकाच्या भूमिकेत शिरून घालता आली पाहिजे.

# नारीशक्ती वंदन

महिलांना लोकसभा आणि राज्यांतील विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांनी विशेष अधिवेशनात संमत केले. महिला आरक्षण विधेयकाला नरेंद्र मोदी सरकारने 'नारीशक्ती वंदन अधिनियम' असे संबोधले आहे. लोकसभेत व राज्यांच्या विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण हा ऐतिहासिक निर्णय आहे. संसदेने हे विधेयक संमत केले म्हणजे लगेचच महिलांना त्याचा लाभ मिळणार नाही. या विधेयकातच दोन अटी आहेत. महिला आरक्षण कधी अमलात येईल? मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यावर आणि जनगणना झाल्यावर

सन २०२१ मध्ये देशात जनगणना होणे अपेक्षित होते, पण कोरोना संकटामुळे ते शक्य झाले नाही. जनगणना कधी होईल ते अधिकृतपणे जाहीर झालेले नाही. महिला आरक्षण अमलात आल्यापासून पंधरा वर्षांपर्यंत चालू राहील. नंतर मुदतवाढ करायची असेल, तर संसद त्याचा विचार करू शकते. ३३ टक्के महिला आरक्षण लागू झाल्यावर लोकसभेवर महिला राखीव मतदारसंघातून १८१ महिला खासदार म्हणून निवडून येतील. महाराष्ट्र विधानसभेवर राखीव महिला मतदारसंघातून ९५ महिला आमदार म्हणून निवडून येतील.

विरोधी पक्षांनी आणि सत्ताधारी आघाडीतील काही मित्रपक्षांनी वेळोवेळी कठोर विरोध दर्शविल्यामुळेच महिला आरक्षण विधेयक गेली २७ वर्षे संमत होऊ शकले नव्हते. महिला आरक्षण संसदेत संमत करून घेण्यात मोदी सरकारने यश मिळवले. विशेष म्हणजे नवीन संसद भवनात संमत होणारे हे पहिलेच विधेयक आहे. म्हणूनच महिला आरक्षणाचे श्रेय कुणाला आवडो अथवा न आवडो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाच आहे.महिला आरक्षण विधेयक मांडलेच जाऊ नये, जर मांडले तर त्यात ओबीसी, एससी, एसटी यांच्यासाठी स्वतंत्र कोटा असावा, अशी भूमिका काही राजकीय पक्षांनी मांडून महिला आरक्षण गेली २७ वर्षे रोखून धरले होते. महिला आरक्षणावरून संसदेत अनेकदा वादविवाद झाला, मंत्र्यांच्या अंगावर धावून जाणे, महिला आरक्षण विधेयकाची प्रत खेचून घेणे, ती सर्वांसमोर टराटरा फाडणे, धक्काबुक्की, खेचाखेची असेही प्रसंग घडले. त्यातून तावून-सुलाखून निघालेले हे विधेयक मोदी सरकारने संमत करून दाखवले. दि. ८ मार्च २०१० रोजी राज्यसभेत समाजवादी पक्षाचे खासदार नंदकिशोर यादव व कमाल अख्तर हे तत्कालीन चेअरमन हमील अन्सारी यांच्या टेबलावर चढले व त्यांनी त्यांचा



माईक उखडून टाकण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय जनता दलाचे सुरेंद्र प्रसाद यादव यांनी विधेयकाची प्रत फाडून अध्यक्षांच्या दिशेने भिरकावली होती. लोकजनशक्ती पक्षाचे सोबीर अली व अपक्ष खासदार एजाज अली यांनी महिला आरक्षणावरील चर्चा रोखण्याचा अटोकाट प्रयत्न केला होता. महिला आरक्षणाला विरोध करण्यासाठी संसेदत गोंधळ घालणाऱ्या ७ सदस्यांना ९ मार्च २०१० रोजी मार्शलने पकडून सभागृहाबाहेर काढले व त्यांना निलंबित करण्यात आले.

१९९६ मध्ये १३ पक्षांची आघाडी असलेल्या युनायटेड फ्रंट सरकारने महिला आरक्षण विधेयक मांडण्याचा प्रयत्न केला होता. तत्कालीन केंद्रीय कायदामंत्री रमाकांत खलप यांनी ८१वी घटना दुरुस्ती करणारे विधेयक मांडले. पण संयुक्त आघाडी सरकारमधील जनता दलासह अनेक घटक पक्षांनी कडाडून विरोध करताच हे विधेयक ३१ सदस्यांच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवले. कम्युनिस्ट पक्षाच्या गीता मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने अनेक शिफारसी केल्या. समितीत शरद पवार, नितीश कुमार, मीरा कुमारी, उमा भारती, राम गोपाल यादव, सुशीलकुमार शिंदे, असे दिग्गज नेते होते. पण त्यातून अनेक फाटेच अधिक फुटले. विधेयकाला विरोध करताना शरद यादव म्हणाले, कौन महिला हैं, कौन नहीं? केवल छोटे बाल रखनेवाली महिलाओंको इसका लाभ नही मिलने देंगे

१९९८ ते २००४ या काळात अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने अनेकदा महिला आरक्षण विधेयक संमत करून घेण्याचा प्रयत्न केला. १३ जुलै १९९८ रोजी केंद्रीय कायदामंत्री एम. थम्बी दुराई यांनी लोकसभेत विधेयक मांडले. त्याला राजद, सपाने कडाडून विरोध केला. राजदचे सुरेंद्र प्रसाद यादव यांनी लोकसभा अध्यक्ष जी. एम. बालयोगी यांच्या हातून विधेयकाची प्रत खेचून घेतली व फाडून फेकून दिली. विधेयकाचे तुकडे तुकडे करून फेकल्यावर ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माझ्या स्वप्नात येऊन मला तसे करायला सांगितले दि. १४ जुलै १९९८ रोजी कायदा मंत्र्यांनी विधेयक मांडण्याचा पुन्हा प्रयत्न केला, पण त्यावर सहमती होऊ शकली नाही. दि. ११ डिसेंबर १९९८ रोजी महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मांडण्याचा सरकारने प्रयत्न केला, तेव्हा सपाचे खासदार थेट अध्यक्षांच्या आसनापाशी गेले, तेव्हा बरीच धक्काबुक्की सदनात झाली. एनडीएमध्ये असलेल्या तेव्हाच्या जनता दलानेही महिला आरक्षणाला विरोध केला होता. वाजपेयी सरकारमधील कायदामंत्री राम जेठमलानी यांनीही २३ डिसेंबर १९९९ रोजी विधेयक मांडले, तेव्हा सपा, बसपा, राजद यांनी जोरदार विरोध केला. त्यानंतरही वाजपेयी सरकारने सन २०००, २००२ व २००३ मध्ये महिला आरक्षण विधेयक मांडण्याचा प्रयत्न केला. जुलै २००३ मध्ये भाजपचे नेते मुरली मनोहर जोशी यांनी सर्व राजकीय पक्षांत सहमती बनविण्याचा प्रयत्न केला पण तो फसला.

सन २००४ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखाली डॉ. मनमोहन सिंग यांचे यूपीए सरकार सत्तेवर आले. तेव्हा तत्कालीन राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी संसदेत केलेल्या अभिभाषणात महिलांना आरक्षण देण्यास आपले सरकार कटिबद्ध असल्याचे म्हटले होते. यूपीए सरकारने ६ मे २००८ रोजी राज्यसभेत महिला आरक्षण विधेयक मांडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सपाचे खासदार यांनी तत्कालीन कायदामंत्री एच. आर. भारद्वाज यांच्याकडे धाव घेऊन त्यांच्या हातातील विधेयकाची प्रत फाडण्याचा प्रयत्न केला. हे विधेयक संसदेच्या स्थायी समितीकडे अभ्यासासाठी पाठविण्यात आले. डिसेंबर २००९ मध्ये समितीने अहवाल दिल्यावर ९ मार्च २०१० रोजी राज्यसभेत बहुमताने महिला आरक्षण विधेयक संमत झाले. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने मांडलेल्या विधेयकाचे भाजप, जनता दल यू, डाव्या पक्षांनी समर्थन केले होते. यूपीए सरकार हेच विधेयक लोकसभेत मात्र मांडू शकले नाही, कारण या विधेयकाला होणाऱ्या विरोधामुळे सरकार धोक्यात आले असते. दि. १९ सप्टेंबर २०२३ रोजी मोदी सरकारने महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मांडले आणि २० सप्टेंबरला ४५१ विरुद्ध २ अशा प्रचंड बहुमताने ते संमत झाले. या विधेयकाला एआयएमआयएमने विरोध केला.

या पक्षाचे असदुद्दीन ओवेसी (हैदराबाद) आणि इम्तियाज जलील (छत्रपती संभाजीनगर) यांनी विधेयकाच्या विरोधी मत नोंदवले. २१ सप्टेंबरला राज्यसभेत महिला आरक्षण विधेयक सरकारने मांडले व त्यावर सात तास चर्चा होऊन २१५ विरुद्ध ० अशा मतांनी म्हणजेच एकमताने संमत झाले. गेली २७ वर्षे हे विधेयक संसदेत मंजूर व्हावे म्हणून ११ वेळा प्रयत्न झाले. पण जे अशक्य वाटत होते ते पंतप्रधान नरेंद्र मोदींनी करून दाखवले. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी महिला आरक्षण विधेयक मंजूर केल्यावर केंद्रीय कायदामंत्री अर्जुन मेघवाल म्हणाले, मोदी हैं तो मुमकीन हैं

सन १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत लोकसभेत ४९ महिला खासदार म्हणून निवडून आल्या होत्या. २००४ मध्ये लोकसभेत ४५ महिला खासदार होत्या. २००९ मध्ये ५९, २०१४ मध्ये ६२ आणि २०१९ मध्ये ७८ महिला खासदार म्हणून लोकसभेत निवडून आल्या. २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीला महिला आरक्षण लागू होणार नाही, कारण त्यापूर्वी सीमांकन व जनगणना होणार आहे. मात्र २०२९ च्या लोकसभेत आरक्षित मतदारसंघातून १८१ महिला लोकसभेवर निवडून येतील. जनता दल युनायटेडच्या सिवान (बिहार) मधील खासदार कविता सिंह म्हणाल्या,

**या देवी सर्वभूतेषु,**
**बुद्धिरूपेण संस्थिता,**
**नमस्तस्यै, नमस्तस्यै,**
**नमस्तस्यै नमो नम:।।**

# वातावरणातील बदल


प्रत्येक ऋतूचा अभ्यास केल्यास त्या त्या ऋतूमध्ये वातावरण बदलाचा परिणाम आपणा सर्वांना जाणवतो. आज सर्वांना नक्कीच वाटेल की, वातावरणात प्रचंड बदल पाहू शकतो. उन्हाळ्यात वाढत्या उष्णतेमुळे कधी एकदा पाऊस पडतो असे प्रत्येकाला वाटत असते. जून ते सप्टेंबर हे पावसाळ्याचे चार महिने. यावेळी वरुणराजाचे उशिरा आगमन झाले तरी सध्या अधूनमधून पाऊस लागत आहे. त्यात कडक उन्हाचे सुद्धा चटके सहन करावे लागतात. त्यामुळे दमट व उष्ण वातावरणाला तोंड देण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. जुलै महिन्यात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. त्यात इतका गारवा निर्माण झाला की, रात्री चादर घेऊन झोपणारी मंडळी ब्लँकेट घेऊ लागली. तर संध्याकाळच्या वेळेला गरम स्वेटर अंगात घालू लागले. या बदलामुळे लोक अचानक आजारी पडू लागले. त्यात काहींचे डोके जड होऊ लागले. सर्दी, खोकला आणि अधून मधून ताप येऊ लागला. असे वातावरण आरोग्याला अपायकारक असते.



पावसाळ्यात बऱ्याच वेळा निसर्गामध्ये वेगाने बदल होत असतात. त्यामुळे योग्य ती काळजी घेणे आवश्यक असते. सध्या बऱ्याच ठिकाणी डेंग्यूचे रुग्ण आढळत आहेत. तेव्हा आरोग्य खात्याने सुद्धा अधिक दक्ष राहाणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रत्येकाने आरोग्याची काळजी घ्यायला हवी. कारण हवामानात बदल झाल्याने रोगराई वाढू शकते. मात्र त्यावर वेळीच उपाय करायला हवेत म्हणजे त्याचा प्रसार होत नाही. त्यासाठी स्वच्छता जास्त महत्त्वाची असते.

सध्या वातावरणाची स्थिती कशी आहे, याची सर्वांना कल्पना आहे. हा जो बदल होतो तो नैसर्गिक असतो. कधी पोषक तर कधी नैसर्गिक संकटांचा नागरिकांना सामना करावा लागतो. कधी उष्ण तर कधी थंड वातावरण असेल तर वयोवृद्ध तसेच दम्याचा आजार असणाऱ्या व्यक्तीला फार त्रास होतो. अशावेळी योग्य ती काळजी घ्यावी लागेल. त्याचप्रमाणे कधी गरम पाणी तर कधी थंड पाणी यामुळे सुद्धा त्रास होण्याची शक्यता असते. वातावरणातील बदलामुळे साथीचे आजार वाढण्याची शक्यता असते. अशावेळी आपण राहात असलेल्या घराची व परिसराची साफसफाई अतिशय महत्त्वाची असते. आपल्या घराची सुद्धा नियमित साफसफाई करायला हवी. त्याचप्रमाणे घराच्या आजूबाजूची सुद्धा नियमित सफाई होणे गरजेचे असते. बरेचजण सुट्टीच्या दिवशी घरी असल्यावर ते स्वत: घराची तसेच परिसराची साफसफाई करतात. घरातील शाळकरी मुलांनी सुद्धा स्वच्छतेकडे लक्ष दिले पाहिजे किंवा आपल्या परिसरात साफसफाई करीत असतील तर त्यांना मदत केली पाहिजे. तेव्हा सध्याच्या बदलत्या वातावरणामध्ये घर तसेच आपल्या घराच्या आजूबाजूचा परिसर साफ ठेवणे निश्चितच आपल्या, कुटुंबाच्या व शेजाऱ्यांच्या आरोग्याला फायदेशीर ठरेल. आता १ ऑक्टोबरपासून हिवाळा ऋतू सुरू होईल. त्यात ऑक्टोबर हिटचा नागरिकांना सामना करावा लागेल. त्यात कधी पाऊस, तर कधी गारवा यामुळे वातावरण आरोग्याला पोषक नसते. याचा परिणाम कधीही आरोग्य बिघडू शकते. त्यासाठी योग्यवेळी आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असते. वातावरण बदल आणि त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम यावर आरोग्य खात्याच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिबिरे आयोजित करण्यात यावीत. आपली तसेच आपल्या कुटुंबीयांची काळजी कशी घ्यावी, याचे प्रात्यक्षिक नागरिकांना करून दाखवावे. आपल्या कुटुंबातील कोण आजारी पडला तर प्रथमोपचार कसा करावा, याची रंगीत तालीम करून सुद्धा दाखवावी. त्यांच्यामध्ये वातावरण बदलाची जाणीव-जागृती करावी. महत्त्वाची बाब म्हणजे ते अंधश्रद्धेच्या आहारी जाणार नाहीत, याची सुद्धा काळजी घ्यावी लागेल. सध्या कोणत्याही ऋतूमध्ये काहीही होऊ शकते. तेव्हा त्याप्रमाणे नागरिकांना जागृत केले पाहिजे. तसेच त्याची काळजीसुद्धा घेता यायला हवी. आज बऱ्याच आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर नसल्याचे दिसते. त्यामुळे गरीब, होतकरू लोकांना खासगी दवाखान्यात जावे लागते. यात आर्थिक भुर्दंड त्यांना बसतो. काही वेळा सर्पदंश झाल्याने आरोग्य केंद्रात घेऊन जातात मात्र त्या ठिकाणी ग्रामपंचायतमधून इंजेक्शन घेऊन या, असे सांगितले जाते. यात बराच वेळ जावून रुग्ण दगावण्याची शक्यता असते. तेव्हा प्रत्येक आरोग्य केंद्रात अशी इंजेक्शन असायला हवीत. इंजेक्शन संपली असतील तर त्वरित आणून त्याचा साठा आपल्या आरोग्य केंद्रात ठेवावा.वातावरणातील बदलामुळे आरोग्याची काळजी घेत असताना आपण घराबाहेर कामानिमित्त गेल्यास परत घरी आल्यावर हात व पाय स्वच्छ धुवून त्यानंतर टॉवेलने पुसून घरामध्ये प्रवेश करावा. आपले टॉवेल दुसऱ्याला देऊ नये. घरात बसून गरम पाणी प्यावे. तसेच गरम पाण्याचा वाफारा घ्यावा. शक्यतो बाहेरचे पदार्थ खावू नयेत. खोकला आल्यास तोंडावर रुमाल धरावा. दुसऱ्याचा रूमाल शक्य तो वापरू नये आणि वेळच्या वेळी हात धुतले पाहिजेत. वातावरण बदलामुळे आपल्या आरोग्यावर कोणताही परिणाम होणार नाही, याची काळजी आपणा सर्वांना घ्यावी लागेल.

## शब्दकोडे-१८८



**आडवे शब्द**

१. उथळ पाण्याचा आवाज ४. नीच, पापी, दुष्ट७. विश्रांती१०. मळलेला११. उफाड्याचा (बांधा)१३. प्रामाणिक१५. अवास्तव१६. मिठी१७. गावबाहेरची वस्ती१९. तालासुराची गट्टी२०. खाली पडू न देता, नेहमी२१. चेहऱ्यावरील तेज२३. प्रफुल्लित२६. बारा वर्षांचा काळ२८. लहान२९. पाणकोंबडा३०. दिखाऊ, खोलवर नसलेले३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ३५. रहस्य३७. लोखंड घासण्याचे साधन३९. फिरणे, चक्कर येणे४२. अपमान४३. लक्ष्मीचे एक नाव४५. युवराज४६. एकरूप४८. बडबड५०. चंद्र५३. प्रश्न५५. नवीन आलेला५७. मृत्यू नसलेला५८. जंगली६०. निकट६१. अनुमती६३. फणसाचा एक प्रकार६५. पाप६८. वितरण७०. दोन महान ग्रंथ७२. मगज७३. उद्याच्या नंतरचा दिवस७४. कणीदार७५. मोठी बहीण७६. विठ्ठलाची पत्नी७७. नाराजी

**उभे शब्द**

१. ताकीद देणे, समज देणे२. खंड३. ताणलेल्या दोरीचा आवाज४. तानाजीला मिळालेली पदवी५. हिंमत६. कपाळभर लावलेले कुंकू७. कहाणीतील गाव८. दीर्घ उच्चराने नरम९. भ्रम१४. नवरदेव१५. इंद्रिय१८. जरा उणीच!२२. वेदना२४. व्रत२५. पूजेचे नक्षीदार ताट२५अ. जहाज लुटणारे२७. खाट, बाज३०. सिंह, जगलाचा राजा३१. आवड३२. रमापती३४. दरवाजा३६. सापाची एक जात३८. नीच, दुष्ट४०. नामघोष४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत४२. अवस४४. मानी स्त्री४५. राजाची पत्नी४६. षष्ठीची देवता४७. पावसाची धार४८. देश, जमीन४९. अरण्य५१. आगबोट५२. द्वाड, खोडकर५३. युद्ध५४. एक सुगंधी वनस्पती५६. धुसफूस, त्रास५७. पुष्कळ, खूप५८. संतापी५९. समीक्षा६२. बाजेची कापडी पट्टी६४. मर्यादा, सीमा ६५. विजार६६. पंकज६७. छोटे जाजम६९. केशरी गराचे स्वस्त फळ७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!७२. मासा पकडण्याचे साधन

## शब्दकोडे १८७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटम नगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

**उभे उत्तर**

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.मघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# भौतिक सोयी सुविधा देण्यासाठी दत्तक योजना म्हणजे खाजगीकरणाचा घाट नव्हे : मंत्री भुसे

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा गुणवत्ता विकास कार्यशाळेत पालकमंत्री यांचे प्रतिपादन**

**मालेगाव । प्रतिनिधी**

पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा गुणवत्ता विकास कार्यशाळा कार्यक्रम मालेगाव येथे संपन्न झाला. यावेळी नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले की, विद्यार्थी घडला तर देश घडेल, विद्यार्थी हा देशाचा आरसा आहे. भविष्यात देशाची वाटचाल गौरवशाली बघायची असल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि शहरी भागातील विद्यार्थी यांच्यातील गुणवत्ता वाढविणे गरजेचे असून उज्वल भविष्यासाठी शिक्षणाचे महत्त्व तळागाळात पोहचवून दर्जेदार शिक्षण देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मंत्री भुसे यांनी केले.

यावेळी पालकमंत्री भुसे यांनी कौळाणे गावातील शाळेचा कायापालट यावर गौरवोद्गार काढले. ग्रामस्थांच्या लोकसहभागातून देवघट शाळेची आकर्षक इमारत आदींसह काही शाळांचा नामोल्लेख करत बदलत्या काळानुसार पालकांचे योगदान शिक्षणासाठी किती महत्वाचे आहे हे समजावून सांगितले, कामाच्या जोरावर वेगळी ओळख मिळत असते. त्यासाठी समर्पण महत्वपूर्ण असून विकासाच्या टप्प्यात शिक्षणाला प्राधान्य देऊन काम करायचे आहे. यासाठी प्रत्येकाने झोकून द्यावे असे आवाहन मंत्री भुसे यांनी केले.

भुसे पुढे म्हणाले की, शाळांमध्ये भौतिक सोयी सुविधा देण्यासाठी दत्तक योजना राबविण्यात येणार असून खासगीकरण होणार नसल्याची ग्वाही देखील भुसे यांनी यावेळी दिली. रोमा थिएटरमध्ये या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी पालकमंत्री दादा भुसे होते. तर अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल होत्या. यावेळी शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव, राष्ट्रपती



शिक्षक पुरस्काराने सन्मानित विक्रम आडसुळ, ज्योती बेलवले, गटविकास अधिकारी भारत वेंदे मंचावर उपस्थित होते.

गटविकास अधिकारी भारत वेंदे यांनी मनोगत व्यक्त करताना तालुक्यातील शैक्षणिक बाबींचा आढावा मांडला. तर ज्योती बेलवले या म्हणाल्या की, मनाची तयारी असली की ध्येय साध्य होते. शाळा बदलण्यासाठी इच्छाशक्ती असेल तर सगळं शक्य होते. गावची शाळा बदलण्यासाठी गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम व शालेय कामकाज याबाबत ओघवत्या शैलीतून त्यांनी माहिती दिली.

ज्योती कदम यांनी पालकमंत्री व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मॉडेल स्कूल संकल्पना कशी साकारली जाते याबाबत माहितीचे यावेळी सादरीकरण केले. राकेश पवार व विक्रम आडसुळ यांनी सांगितले की स्वतःची छोटीशी वस्ती शाळा असून तिच्यात झालेल्या बदलाचे चित्रफिती दाखवली. तिच्या बदलांसाठी शिक्षकांचा पुढाकार महत्वाचा आहे. पालकांची जनजागृती व बदलत्या स्वरूपास मदत मिळते. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी देखील यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षणाशिवाय विकास अशक्य आहे. यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. समस्या असतील नक्कीच पण त्यावर मार्ग काढू पालकमंत्री यांच्या प्रेरणेतून १२८ शाळा जिल्ह्यात मॉडेल झाल्या आहेत, भविष्यात सर्व तालुका मॉडेल करण्यासाठी काम करूया, यासाठी सर्वांचे योगदान महत्वाचे असेल असे असा विश्वास मित्तल यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक संदीप सुर्यवंशी यांनी तर सूत्रसंचालन गायत्री आहेर, विद्या पाटील, ज्योत्स्ना काकळीज यांनी केले. कार्यशाळेतला प्रभारी गटशिक्षणाधिकारी तानाजी घोंगडे, नांदगावचे प्रमोद चिंचोले यांच्यासह विविध गावचे सरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, ग्रामसेवक व तालुक्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक उपस्थित होते.

# ‘देव द्या, देवपण घ्या’ हा स्तुत्य उपक्रम



**नाशिककरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे**

**अभिनेता अभिजीत खांडकेकर यांचे आवाहन**

**नाशिक । प्रतिनिधी**

गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी गेल्या तेरा वर्षांपासून राबविण्यात येत असलेला देव द्या, देवपण घ्या ! हा स्तुत्य उपक्रम असून नाशिककरांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अभिनेता अभिजीत खांडकेकर यांनी केले आहे.

देव द्या, देवपण घ्या! या उपक्रमांतर्गत नाशिककरांमध्ये जनजागृती करणाऱ्या माहितीपत्रकांचा प्रकाशन सोहळा अभिनेता अभिजीत खांडकेकर यांच्या हस्ते व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड.रविंद्र पगार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी डॉ. राजेंद्र आभाळे हे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. त्याप्रसंगी अभिजीत खांडकेकर बोलत होते. सुविचार मंच व विद्यार्थी कृती समितीच्या माध्यमातून युवकांची शक्ती विधायक कार्यात सहभागी होत आहे हे कौतुकास्पद असल्याचे देखील अभिनेता अभिजीत खांडकेकर यांनी यावेळी बोलतांना सांगितले. प्रास्ताविकात संयोजक आकाश पगार यांनी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची महिती दिली.

प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती व त्यावर केलेले रासायनिक रंगांचे रंगकाम यामुळे गोदावरी नदीचे प्रदूषण होत राहते. गोदावरी नदीचे हे जलप्रदूषण रोखण्यासाठी जनजागृती करणाऱ्या या माहितीपत्रकांचे घराघरात वाटप करण्यात येणार आहे. तसेच देव द्या, देवपण घ्या! या उपक्रमाची युवकांकडून मोठ्या प्रमाणावर सोशल मिडीयाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. पाच दिवस व सात दिवसांच्या गणेशोत्सवातील मूर्तींचे संकलन देखील करण्यात येणार आहे. गेल्या बारा वर्षांपासून देव द्या, देवपण घ्या उपक्रम राबविला जात असून यंदाचे तेरावे वर्ष आहे. उपक्रमात सहभागी होण्यासाठी ९४२१५६३५५५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रकाशन सोहळ्याप्रसंगी अभिनेता अभिजीत खांडकेकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड.रविंद्रनाना पगार, डॉक्टर राजेंद्र आभाळे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आकाश पगार यांनी तर विशाल गांगुर्डे यांनी आभार मानले. सुत्रसंचलन सागर बाविस्कर यांनी केले. प्रकाशन सोहळ्याचे प्रास्ताविक आकाश पगार यांनी तर विशाल गांगुर्डे यांनी आभार मानले. सुत्रसंचलन सागर बाविस्कर यांनी केले.

यावेळी डॉ.राजेंद्र आभाळे, विलास सानप, आबा गांगुर्डे, राहुल काळे, आकाश पगार, विशाल गांगुर्डे, सागर बाविस्कर, सोनु जाधव, तुषार गायकवाड, संदिप उफाडे, अविनाश बरबडे, भावेश पवार, कुणाल सानप, कोमल कुरकुरे, गौरी घाटोळ, प्रणाली शिंदे, भाग्यश्री भुजबळ, आकाश खरे, सुजित सोनवणे, ललित पिंगळे, वैभव बारहाते, अक्षय नेर, योगेश माळोदे, मदन म्हैसधुणे, किशोर वाघ, योगेश निमसे, प्रथमेश पवार, पुष्पक पवार, ओम निकम, संदिप आहिरे, विजय पगार, योगेश पगार, आकाश ढोले, जयंत सोनवणे, युवराज कुरकुरे, राहुल मकवाना, रोहित कळम्बकर, शुभम पाटील, गणेश सोनवणे, सुरेंद्र आहिरे, अतुल वारुंगसे, सिद्धार्थ माळी, महेश हिरे, अमोल पवार, हरी मोरे, निलेश चौधरी, देवा भोगे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

---

**प्रोसेज जमा** **ॲड.मनोजकुमार डी. खैरनारर,साक्री**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २८७/२०२३**

गं.भा. वंदना सुखांतिलाल जैन व इतर, उ.व.६०, धंदा - घरकाम, राहणार-दहिवेल, ता. साक्री, जि. धुळे **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही,** **- सामनेवाला**

मयत -कै. सुखांतिलाल बंडूसा जैन

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक ०२/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. सुखांतिलाल बंडूसा जैन यांचे निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. गं.भा. वंदना सुखांतिलाल जैन,
२. सौ. सोनल नितीन जैन,
३. सौ. स्वाती निलेश जैन,
४. सौ. प्रियंका सिध्दार्थ जैन,
५. श्री. सागर सुखांतिलाल जैन,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साकी येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क्र. ३ यांचे न्यायालयात दिनांक १७/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक-२१/०९/२०२३ (शिक्का) आदेशावरुन,
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक,**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेज जमा** **ॲड.प्रकाश डी.देवरे**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २८१/२०२३**

श्री. कैलास भटु बच्छाव व इतर, उ.व. - ५२, धंदा-नोकरी, राहणार - पिंपळनेर, सुहित पार्क, लाल मैदान, ता. साक्री, जि. धुळे **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही,** **- सामनेवाला**

मयत -कै. उर्मिला बाबुलाल पिंपळे (मृत्यू दिनांक - ०८/०८/२०२३)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक ३०/०८/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. उर्मिला बाबुलाल पिंपळे यांचे दिनांक ०८/०८/२०२३ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्री. कैलास भटु बच्छाव, - पती,
२. कु. अनुष्का कैलास बच्छाव, - मुलगी,
३. कु. समन्यु कैलास बच्छाव, - मुलगा,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. अर्जदारांना खातेनिहाय शासकीय, निमशासकीय, महसुल, सिटी सर्व्हे, ग्रामपंचायत व बॅकिंग कार्यालयातील कामांसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क्र. २ यांचे न्यायालयात दिनांक १३/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक-५/०९/२०२३ (शिक्का) आदेशावरुन,
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक,**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेज जमा** **ॲड.अक्षय ए. सगर,,साक्री**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २६०/२०२३**

श्री. पांडुरंग भगवान घरटे व इतर, उ.व. ७८, धंदा - शेती, राहणार सामोडे, ता. साक्री, जि. धुळे **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही,** **- सामनेवाला**

मयत - कै. भगवान उखा घरटे (मृत्यू दिनांक - १९/०६/२०००)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक ११/०८/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. भगवान उखा घरटे यांचे दिनांक - १९/०६/२००० रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्री. पांडुरंग भगवान घरटे,
२. श्रीमती. इंदुबाई रामदास क्षिरसागर,
३. श्रीमती. सुमनबाई रामदास भोगे,
४. श्री. रविंद्र भगवान घरटे,
५. श्री. सुभाष भगवान घरटे,
६. श्री. प्रभाकर भगवान घरटे,
७. श्रीमती. पुष्पाबाई सुभाष महाजन,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साकी येथील मे. २ रे सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साकी कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक २६/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक-२१/०९/२०२३ (शिक्का) आदेशावरुन,
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक,**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेज जमा** **ॲड.अक्षय ए. सगर,,साक्री**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. ३१४/२०२३**

चि. राहुल देविदास साने व इतर, उ.व. २३, धंदा - शिक्षण, राहणार-धोंगडे दिगर, ता.साक्री, जि.धुळे **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही,** **- सामनेवाला**

मयत - कै. देविदास दानियल साने ( मृत्यू दिनांक - २६/०५/२०२०)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक २०/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. देविदास दानियल साने यांचे दिनांक २६/०५/२०२० रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे

खालील प्रमाणे वारस आहेत.

१. राहुल देविदास साने,
२. ताईबाई दानियल साने,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क्र. ३ यांचे न्यायालयात दिनांक ३०/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक-२१/०९/२०२३ आदेशावरुन,
(शिक्का)
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक,**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेज जमा** **ॲड.अक्षय ए. सगर,,साक्री**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २९६/२०२३**

गं.भा.दमयंताबाई अनाजी मोहिते व इतर,
उ.व.-८१,धंदा - काहीनाही,
राहणार-म्हसदी प्र.नेर, ता.साक्री, जि. धुळे **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही,** **- सामनेवाला**

मयत - कै. आनाजी नथ्थु मोहिते (मृत्यू दिनांक - २९/०३/२०२२)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक ११/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. आनाजी नथ्थु मोहिते यांचे दिनांक २९/०३/२०२२ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. गं. भा. दमयंताबाई अनाजी मोहिते,
२. श्री. रविंद्र अनाजी मोहिते,
३. सौ. अनिता भ्र. मनोहर आगळे,
४. सौ. कमल भ्र. अण्णा थोरात,
५. सौ. जयश्री भ्र. विजय आखाडे,
६. गं.भा. निकीता विजय मोहिते,
७. कु. प्रेरणा विजय मोहिते,
८. चि. अमोल विजय मोहिते,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क्र. २ यांचे न्यायालयात दिनांक २१/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक - २१/०९/२०२३ (शिक्का) आदेशावरुन
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक,**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेज जमा** **ॲड.अक्षय ए. सगर,,साक्री**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे.सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २८४/२०२३**

श्रीमती. लिलाबाई पुंजाराम बोरसे व इतर,
उ.व. ७५, धंदा - शेती, राहणार साक्री, प्लॉट नं.३६, चिराई कॉलनी, ता. साक्री, जि.धुळे **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही,** **- सामनेवाला**

मयत -कै. कैलास पुंजाराम बोरसे

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक ०१/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. देविदास कैलास पुंजाराम बोरसे यांचे निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. लिलाबाई पुंजाराम बोरसे,
२. गं.भा. प्रतिभा कैलास बोरसे,
३. कु. चिराग कैलास बोरसे,
४. कु. परी कैलास बोरसे,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क्र. ३ यांचे न्यायालयात दिनांक १७/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक-२१/०९/२०२३ (शिक्का) आदेशावरुन,
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक,**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

## न्यूज कॉलम

### बोरीस केंद्रात पाककृती स्पर्धा

**धुळे ।** येथीलतालुक्यातील बोरीस केंद्रशाळेत पाककृती स्पर्धा झाली. स्पर्धेत निकुंभे जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थिनी विजेत्या ठरल्या. प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेंतर्गत पोषण पंधरवड्यानिमित्त तृणधान्यावर आधारित पाककृती स्पर्धा घेण्यात आली. केंद्रातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या शाळांनी नियोजनानुसार बाजरी, दादर, ज्वारी, तांदूळ, मगर, राळा, नागली अशा विविध प्रकारच्या तृणधान्यावर आधारित पाककृती बनवून आणल्या होत्या.

### बुद्धिबळ स्पर्धेत सैनिकी शाळेचे यश

**धुळे ।** जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत सैनिकी शाळेतील मुलांनी सुयश मिळवले. अक्षय पावरा, दीपक गांगुर्डे, नेहा बागुल, कोमल पवार हे विभागस्तरीय पात्र ठरले. सैनिकी शाळेतील प्रा. प्रमोद साळुंके यांनी पंच म्हणून कामकाज पाहिले. मुकेश सोनवणे, अतुल दहीवेलकर, क्रीडा अधिकारी रेखा पाटील यांचे सहकार्य लाभले. मुख्याध्यापक, शिक्षकांनी खेळाडुंचे कौतुक केले.

# पद गेलं तरी बेहत्तर आदिवासी आरक्षणाला धक्का लागू देणार नाही

### आमदार नरहरी झिरवाळांचा इशारा

**नाशिक । प्रतिनिधी**

आजही अनेक भागातील आदिवासी समाज विकासापासून वंचित आहे. त्यातच आदिवासी आरक्षणात धनगर आरक्षणाचा समावेश करणे चुकीचे आहे. धनगर समाजाला शासनाने आरक्षण जरूर द्यावे, त्याला आमचा कोणताही विरोध नाही. मात्र, आदिवासींचे आरक्षण कमी करून धनगर समाजाला आरक्षण देण्यास आमचा विरोध आहे, असे स्पष्ट मत आमदार नरहरी झिरवाळ यांनी व्यक्त केले.

एकीकडे धनगर आरक्षणाचा मुद्दा पेटला असून राज्यभरात धनगर समाज बांधव आक्रमक आहे. धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करण्याची मागणी धनगर संघटनांकडून केली जात आहे. मात्र, आदिवासी समाज संघटनाकडून विरोध आहे. याच पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये आमदार नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वात आदिवासी संघटनांची बैठक घेण्यात आली. यावेळी झिरवाळ बोलत होते. 'आम्ही आदिवासी जातीचे आहोत, म्हणून आम्हाला पदांची संधी मिळाली. पद असेल किंवा नसेल आदिवासी समाज बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही आमची प्रमुख जबाबदारी आहे. शासनाने धनगर समाजाला आरक्षण जरूर द्यावे, त्याला आमचा कोणताही विरोध नाही. मात्र, आदिवासींचे आरक्षण कमी करून धनगर समाजाला आरक्षण देण्यास आमचा विरोध आहे, असे स्पष्ट मत आमदार नरहरी झिरवाळ यांनी व्यक्त केले. राज्यभर मराठा आंदोलनानंतर आता धनगर आंदोलन सुरु असून धनगर समाजाला आदिवासी प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. आदिवासी संघटनांकडून येत्या ऑक्टोबर महिन्यात राज्यभर आदिवासी जनआक्रोश आंदोलन केले जाणार असल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनाचे नियोजन करण्यासाठी नाशिक शहरातील म्हसरूळ परिसरात सर्व आदिवासी संघटनांची बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार झिरवाळ बोलत होते. 'धनगर समाजाला शिक्षण, नोकरीत आरक्षण व इतर आरक्षण द्यावे, त्याला विरोध नाही. मात्र, अनुसूचीत जमाती म्हणजे आदिवासींच्या आरक्षणाला धक्का नको, कुठल्याही समाजात सधन असतात तसे गरीबही असतात, त्यांचेही आम्ही प्रतिनिधी आहोत. मात्र, आमचे आरक्षण कमी करून त्यांना द्यावे, हे मान्य नाही. धनगर समाजाच्या गोरगरीब जनतेला न्याय मिळाला पाहिजे, ही आमची लोकप्रतिनिधी म्हणून भूमिका आहे, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.



### पुढील महिन्यात राज्यव्यापी आंदोलन


**दरम्यान, सर्व नोकरीत खासगीकरण सुरु झाले आहे, त्यामुळे आदिवासी समाजाला वेठीस धरण्याचे काम सरकार करत आहे. त्यामुळे अशा कंत्राटीकरणाला विरोध आहे, आदिवासी समाजात बोगस आदिवासी असून अशांना शासनाने प्रमाणपत्र देऊ नये, पेसा भरतीला आलेली स्थगिती, धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रमाणपत्र देऊ नये, पाच वर्षांपासून आदिवासी सल्लागार समितीची बैठक झाली नाही, ती बैठक तातडीने घ्यावी, अशा मागण्या यावेळी बैठकीत करण्यात आल्या. तसेच धनगर समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, मात्र आदिवासी आरक्षणाला धक्का नको अशी प्रतिक्रिया आदिवासी बचाव अभियानाचे राम चौरे यांनी दिली. शिवाय या पार्श्वभूमीवर राज्यव्यापी आदिवासी जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.**

# हस्ती सांस्कृतिक मंडळाचा इको फ्रेण्डली गणपती बाप्पा

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेज दोंडाईचा या शाळेचे हस्ती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाने गेल्या चौदा वर्षापासून सात दिवशीय गणेशोत्सव साजरा करीत आहे. मंडळाने पर्यावरण पूरक श्री बाप्पांच्या मूर्त्या साकारून, उत्सव साजरा करण्याची परंपरा १० व्या. वर्षीही जोपासत; पर्यावरण संवर्धनाला साहाय्यभूत होणारा श्री बाप्पांचा उत्सव यावर्षीही साजरा करीत आहे.

याबाबत वृत्त असे की, यावर्षीही शाळेत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून गणेश मूर्ति साकारण्यासाठी ' माझ्या कलेतून... माझा बाप्पा ...! ' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत कला शिक्षक मूर्तिकार मनोहर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज, हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरूकुल या शाळांच्या विद्यार्थ्यांनी सुंदर व मनोहारी पर्यावरण पूरक श्री बाप्पांच्या मूर्त्या साकारल्या. यातील इ. ६ वी ची विद्यार्थिनी गार्वी भरत अग्रवाल हिने साकारलेली श्रीबाप्पांच्या मूर्तिची स्थापना हस्ती सांस्कृतिक मंडळाने केली आहे. सोबतच नुकतेच ' इस्त्रो ' या भारतीय अवकाश संशोधन संस्थेतर्फे चांद्रयान मोहीम यशस्वी झाल्यानंतर; इस्त्रोतर्फे सूर्याच्या अभ्यासासाठी मोहीम आखून ' आदित्य एल - वन ' यानाचे यशस्वी उड्डाण केले आहे. याबाबतीत



' हस्ती सांस्कृतिक मंडळाने ' या वर्षी श्री बाप्पांच्या जवळ स्टेजवर ' आदित्य - एल - वन ' उड्डाणाचा; व मर्क्युरी, व्हिनस, पृथ्वी, मार्स, ज्युपिटर, सॅटर्न, युरेनस, नेपच्यून या ग्रहांचा सुंदर देखावा साकारला आहे. सदरचा ' देखावा गणेश भक्तांसाठी आकर्षण ठरत आहे. तसेच या सात दिवशीय श्री गणेशोत्सव दरम्यान इ. १ ली ते इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी गणपती स्तोत्र, अथर्वशिर्ष पाठांतर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, भक्ती व भावगीत गायन स्पर्धा, भक्ती गीतांवर आधारीत एकल नृत्य स्पर्धा, श्री गणेश प्रश्नमंजुषा स्पर्धा यांचेही आयोजन करण्यात आले आहे. वरील गणेश उत्सव यशस्वीपणे साजरा करण्यासाठी हस्ती स्कूल प्राचार्य हरिकृष्ण निगम यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळातील शिक्षक - मनोहर यादव, माधुरी गोसावी, प्रविण गुरव, संजय मोरे, मनोज ठाकुर, राकेश ईशी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद परिश्रम घेत आहेत.

# दादासाहेब वामन विष्णू शिनकर नागरी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

शहरात दादासाहेब वामन विष्णू शिनकर नागरी सहकारी पतसंस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पतसंस्थेच्या देवपूर येथील मुख्य कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संचालक मंडळ यांच्या माध्यमातून पतसंस्थेच्या आता पर्यंत झालेल्या कामाबाबत मॅनेजर अजित राजपूत यांनी सभासदांना माहिती दिली. संस्थेचे चेअरमन उदय शिनकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

सभेत महत्वाचा व सभासद हिताचा विचार करत चेअरमन अभय शिनकर यांनी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर कर्ज वाटप सुरू करणार असल्याची घोषणा केली. २०२२ ते २३ या सहकार वर्षातील वार्षिक अहवाल वाचून मंजूर करण्यात आला. तसेच हिशोब तपासणी तथा सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्याबाबत विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आला. यांसह विविध विषयांना सर्वानुमते मंजूर देण्यात आली. यावेळी शिनकर यांनी पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहार बाबत समाधान व्यक्त करत विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडण्याचे आवाहन केले. संस्थेने आजपावेतो लोकहिताचा विचार करत लोकोपयोगी कामांना प्राधान्य दिले. संस्थेची चांगली परिस्थिती असुन पतसंस्था नफ्यात आहे. चेअरमन उदय शिनकर, व्हा चेअरमन कपूरचंद बाविस्कर, संचालक सतीश बहाळकर, सुरेश काळे, जयप्रकाश महाले, नरेंद्र पिंगळे, सुचिता बहाळकर, अल्का अमृतकर, मॅनेजर अजितसिंग राजपूत, सभासद सुभाष वाणी, विजय नेरकर, अरुण अमृतकर, प्रवीण मिस्तरी, नरेंद्र येवले, शिवदास पाटील, दिनेश कोठावदे, राजहंस कुभांरे, भारत विभुते, दिगंबर सोनवणे, मधुकर येवले व कर्मचारी उपस्थित होते.

# घुसरे येथे एक गाव एक गणपतीची पंधरा वर्षापासून परंपरा कायम




### भडणे येथील पोलीस पाटील युवराज माळी यांच्या हस्ते आरती

**चिमठाणे । प्रतिनिधी**

शिंदखेडा तालुक्यातील घुसरे हे सुमारे सहाशे लोकस्तीचे गाव असून या गावात सर्वच सण गावकरी एकत्र येऊन एक गाव एक उत्सव म्हणून साजरे करत आहेत. गावात सर्व समाजातील नागरिक असून गावाची ग्रामपंचायत वरुळ ग्रुप ग्रामपंचायत आहे.

गावात संपूर्ण गावकरी शेतीवर तसेच मोलमजुरी करून व रोजनदारी करणारे कुटुंब या गावात आहे. अतिशय शिस्तप्रिय शांत म्हणून गावाची ओळख असून येथील गावकरी एकमेकांच्या सुखदुःखात नेहमी धावून येतात. संपूर्ण गावकरी एक कुटुंबाप्रमाणे एकमेकांच्या सुखदुःखात भाग घेऊन सण उत्सव साजरे करण्यात व्यस्त असतात. गावकरींचा एकोपा दिसुन येतो. यामुळेच गावकरी दरवर्षी एक गाव एक गणपती साजरा करतात. सायंकाळी आरती झाल्यावर गावकरी सांस्कृतिक कार्यक्रम राबवितात यात डान्स,गरबा, व्यसनणमुक्तीचे तसेच शाळकरी मुलांना ईतर स्पर्धा गणेश मंडळ आयोजन करते. संपूर्ण गावात भक्ती मय वातावरण दिसून येते तसेच सात दिवस चालणाऱ्या या उत्सवात गावकरी सोयीने आपल्या इच्छाशक्ती प्रमाणे वर्गणी देऊन उत्सव साजरे करतात व शेवटच्या दिवशी सर्व गावकरी मिळून मंडळातर्फे महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. येथील गावकरी अतिशय मेहनती व कष्टकरी शेतकरी शेतमजूर वर्ग असून गावात चार-पाच नागरिक वगळता कुणालाही गावात नोकरी नाही. अतिशय कष्टकरी व प्रामाणिक येथील नागरिक आहेत. उत्सवासाठी बाहेर गावातील मंडळी कडून कुठलीही वर्गणी घेत नाही व गणरायाची विसर्जन मिरवणुकीत स्वतः बनवलेले वाजंत्री पारंपारिक वाद्यांच्याव ढोल ताशांच्या साह्याने मिरवणूक काढण्यात येते. म्हणून घुसरे या गावाने एक गाव एक गणपतीची परंपरा आजही टिकून ठेवली आहे या उत्सवासाठी गावकरी तरुण वर्ग पोलीस पाटील हीरारी ने भाग घेऊन उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी प्रयत्न करीत असतात. आरतीचा मान भडणे येथील आदर्श पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील युवराज माळी यांना देण्यात आला होता. गणेश मंडळाचे अध्यक्ष गणेश मराठे, उपाध्यक्ष सुनील सोनवणे, भगवान सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य संभाजी पेंढारकर, पिताबर मराठे, राजेंद्र मराठे, रघुनाथ मराठे, समाधान मराठे, विलास मोरे, युवराज मोरे, पितांबर मराठे, पोलीस पाटील प्रवीण सोनवणे, हिरामण पेंढारकर यांनी एक गाव एक गणपती उत्सवासाठी प्रयत्न केले आहेत.

# जैताणेत १० सार्वजनिक गणेश मंडळांकडून बाप्पाला निरोप



**जैताणे । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील जैताणे परिसरातील १० सार्वजनिक गणेश मंडळांकडून लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. पाचव्या दिवसापर्यंत शेकडो मूर्तीचे सुरक्षित व शांततेत विसर्जन जैताणे शहरासह माळमाथा व आजूबाजूच्या परिसरात गणेश चतुर्थीच्या दिवशी घरगुती व सार्वजनिक गणेश मंडळातर्फे गणपती स्थापन करण्यात आली आहे. त्यानंतर गणपती विसर्जन टप्याटप्याने होत आहे.

यामध्ये पाचव्या दिवशी जय भद्रा ग्रुप व इतर गणेश मंडळ यांची संपूर्ण गावात मिरवणूक काढण्यात आली. संजय नगर, विठ्ठल मंदिर, धनगर वाडा, महाजन गल्ली, सावता चौक, चावडी चौक, पाचवी गल्ली ते माणिक चौक पर्यंत अशी वाजत गाजत ढोल ताशांच्या गजरात जय घोषणा देत जैताणे गावातील गणपती बाप्पाचे गावालगत नकट्या बंधारा येथे विसर्जन करण्यात आले. विसर्जनासाठी भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून जैताणे ग्रामपालिका कडून व प्रशासनातर्फे चांगली व्यवस्था करण्यात आली होती. पाचव्या दिवशी जैताणे गावातील सार्वजनिक १० मंडळांसह सेकडो घरगुती गणपतीचे विसर्जन करण्यात आले. अतिशय उत्साहात, सुरक्षितरित्या है विसर्जन पार पडले व पोलिस दलाच्या वतिने विसर्जनाच्या पाश्र्वभूमीवर सर्वतोपरी काळजी घेण्यात आली. विसर्जन ठिकाणी तलावांसह कोणीतीही अनुचित घटना घडू नये म्हणून निजामपूर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सोनवणे आनंद पाटील जयेश गांगुर्डे यांनी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# प्रा. डॉ. इंदिरा गिरासे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान

**शिरपूर । प्रतिनिधी**



श्रीमती एच आर.पटेल कला महिला महाविद्यालयातील संरक्षण शास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. इंदिरा गिरासे यांना नुकताच ५ सप्टेंबर या शिक्षक दिनाचे औचित्य साधून धुळे येथील ध्येय मानवी विकासाचे रायबा बहु उद्देशीय संस्थेने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक रत्न पुरस्कार प्रदान केला.

डॉ. इंदिरा गिरासे यांना हा पुरस्कार त्यांच्या समाज उन्नतीसाठी सतत कार्यरत राहून विदयार्थी आणि समाज घडवून राष्ट्राच्या सर्वांगीण विकासात बहुमोल योगदान दिल्याबद्दल त्यांना या सेवाभावी संस्थेने गौरविले आहे. डॉ. इंदिरा गिरासे या दूरदृष्टीच्या शिक्षिका आहेत. वक्तृत्व, सूत्रसंचालन या कौशल्यात त्या पारंगत आहेत. सामाजिक कार्याची आवड यासाठी याही आधी त्यांना विविध मान्यवर संस्थेचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, प्रभाकरराव चव्हाण, महाविद्यालय प्राचार्य डॉ. शारदा शितोळे, उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील, सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

# मुकेशभाई पटेल सैनिकी विद्यालयाने बास्केटबॉल स्पर्धेत जिल्ह्यात पटकावला प्रथम क्रमांक

**जैताणे । प्रतिनिधी**

शिरपूर येथील विलेपार्ले केळवाणी मंडळ संचलित मुकेशभाई पटेल सैनिकी शाळा व कनिष्ठ विज्ञान महाविदयालयाने घवघवीत यश प्राप्त करून बास्केटबॉल स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. धुळे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे जिल्हा शालेय शासकीय बास्केटबॉल क्रीडा स्पर्धा कुमायुन क्लब, धुळे येथे संपन्न झाल्या.

यात कॅप्टन सारगे मधुली प्रीतमकुमार, पाटील कस्तुरी संतोष, महाजन डिंपल शिवदास, पाटील खुशी शैलेश, राजपुरोहित काजल नरेंद्रसिंग, काव्या निहार देसाई, सिमरन कानसिंग राजपुरोहित, दिशा हरीश मदनी, विधी निलेश टोम्पे, पल्लवी रवींद्र तावडे, तनिष्का सुनील गुरव, ईश्वरी विलास राणे, रिद्धी शशिकांत चौधरी यांचा समावेश होता.

# आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त धुळ्यात ९७ जणांचे उत्स्फूर्तपणे रक्तदान

### एसएसव्हीपीएस महाविद्यालयात रक्तदान शिबीर

**धुळे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसामित्ताने एसएसव्हीपीएस विज्ञान महाविद्याल देवपूर धुळेच्यावतीने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी एकूण ९७ जणांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले.तर १३५ जणांची रक्तगट तपासणी करण्यात आली.रक्तदान शिबीराचे उद्घाटन माजी कृषी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.





याबाबत सविस्तर वृत्त असे कि, श्री शि.वि.प्र.संस्थेच्या कै.डॉ.पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयाच्यावतीने आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने वाढदिवस सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने महाविद्यालयात विविध शैक्षणिक कार्यक्रमांसह प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येत आहे. आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन शनिवार दि.२३ सप्टेंबर रोजी विज्ञान महाविद्यालयात भव्य रक्तदान व रक्ततपासणी शिबीर घेण्यात आले. रक्तदान शिबीराचे उद्घाटन माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. उदघाटनपर कार्यक्रमात माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांनी सांगितले कि,जीवनात राजकारण करीत असतांना उत्तम काम करणे गरजेचे असते. राजकारण आणि समाजकारणातून जनतेची सेवा घडत असते. त्यात सर्वात मोठे समाधान असते. कार्यकर्ते व पदाधिकार्यांनी स्वताला झोकून देत गोरगरीब,सर्वसामान्य जनता आणि शेतकर्यांना मदत केली पाहिजे असेही आवाहन त्यांनी शेवटी केले. रक्तदान शिबीरात ९७ जणांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले तर १३५ जणांची रक्तगट तपासणी करण्यात आली.श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्याल व रुग्णालय आणि जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या रक्तपेढीने रक्तसंकलन केले. यावेळी आयोजित कार्यक्रमाला बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील,तालुका काँग्रेस अध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे,बाजार समितीचे संचालक साहेबराव खैरनार, विशाल पाटील,रावसाहेब पाटील, पं.स.चे माजी सदस्य पंढरीनाथ पाटील, डॉ.एस.टी.पाटील, प्राचार्य एम.व्ही.पाटील,प्राचार्य डॉ.मनोहर पाटील, जि.प.सदस्य अरुण पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, खरेदी विक्रीचे संचालक बापू खैरनार, संतोष राजपूत,माजी सरपंच सोमनाथ पाटील,उपसरपंच हिरामण पाटील,उपप्राचार्य प्रा.किशोर बोरसे, आरोग्य सेवक गोकुळ राजपूत, प्रा.डी.व्ही. आहिरराव, कार्यालयीन प्रबंधक मुकेश पाटील, शशिकांत पाटील, प्रविण महाले, डॉ.सुनिल पाटील, डॉ.अमोल नंदवालकर, प्रा.के.एम.बोरसे, डॉ.एस.एम.कोष्टी आदी उपस्थित होते. एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग लिओ क्लब, राष्ट्रीय छात्र सेना विभाग, राष्ट्रीय योजना विभाग यांनी परिश्रम घेतले.

## घर विकणे आहे

चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे

: संपर्क :

Mo. 81779 29477

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र





# नको आरक्षण, आम्हाला द्या संरक्षण सजीव देखाव्याने वेधले लक्ष

## देखावा पाहण्यासाठी महिलांसह नागरिकांची प्रचंड गर्दी























धुळे ।

येथील गल्ली क्र. ६ मधील नवसाला पावणाऱ्या कोंडाजी तालमीच्या गणरायाची महाआरती काल भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तसेच उत्तर महाराष्ट्राचे महामंत्री विजय चौधरी आणि विधानसभा प्रमुख, माजी जिल्हाध्यक्ष अनुप अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आली. तर आरासचे उद्घाटन माजी आ.राजवर्धन कदमबांडे यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान मंडळाने नको आम्हा महिलांना आरक्षण, आम्हाला द्या फक्त संरक्षण या थीमवर महिलांचा प्रश्न सजीव देखाव्यातून मांडला आहे. या सजिव देखावा पाहण्यासाठी महिलांसह नागरिकांची प्रचंड गर्दी केली आहे. यावेळी महापौर प्रतिभा चौधरी, माजी आमदार शरद पाटील, व्यायाम शाळेचे अध्यक्ष भगवान कालेवार, माजी महापौर चंद्रकांत सोनार, भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, युवराज करनकाळ, महादेव परदेश, इर्शादभाई जहागीरदार, डॉ. सुशील महाजन, यांच्यासह व्यायाम शाळेचे पदाधिकारी, गणेश मंडळ सदस्य उपस्थित होते. गणे- शोत्सव यशस्वितेसाठी मंडळाचे मार्गदर्शक भगवान कालेवार यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष निखिल मोमया, कार्याध्यक्ष चार्ली आखाडे, स्वागताध्यक्ष महेश कालेवार, उपाध्यक्ष अजिंक्य धात्रक, यशराज साळुंखे, खजिनदार चेतन धामेचा सचिव सौरभ भारस्कर अक्षय गुरव, प्रसिद्धी प्रमुख यश आखाडे, शुभम काळे, करन सूर्यवंशी, पियुष भारस्कर, सजावट प्रमुख जगदीश सोनार,स्वप्नील शर्मा, संपर्कप्रमुख युवराज कालेवार, पप्पू भाई डापसे, जयेश मगर परिश्रम घेत आहेत.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र


श्री पवनपुत्र गणेश मंडळ



# धुळ्यातील गणरायाचे दर्शन

## मंडळांकडून धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



वंदे मातरम प्रतिष्ठान


प्रिन्स मित्र मंडळ


साई बाबा मित्र मंडळ


स्टेशन रोडवरील साईबाबा मुंज्या मारोती मित्र मंडळ


चितोड रोडवरील क्रांती चौक


दिप नगरमधील ओंकारेश्वर मित्र मंडळ


होळनांथे येथील शिवपुत्र गणेश मित्र मंडळ


रामवाडी येथील श्रीराम बजरंग मित्र मंडळ


पोलीस बॉईज मित्र परिवाराची आरास

संकलन : दिपक वाघ